## ॥ बाबा ॥
## नाच

नाच रे कान्हा म्हमद्यांच्या मेळ्यात
नाच रे कान्हा नाच
नटूनी थटूनी गोपी आल्या रे
रास क्रिडेसाठी जमल्या रे
रूप तुझे पाहून, गोपी गेल्या मोहून (2)
प्रितीच्या तालावर नाच ......

बालस्वरूपात बसला ऐटीत रे
गोष्टी सांगे तो थोडक्यात रे
दिसतो हा मोठा आहे हा लहान (2)
सांगे हा गोष्टी आत्मज्ञानाच्या
नाच रे ...........

टिप-या खेळी सर्वांशी एकसाथ रे
साक्ष दिली सर्वत्र असण्याची रे
फोडूनी देह बुद्धी
दिली नामाची भक्ती (2)
नामाच्या सुरावार नाच ...........

हर्षाचा गुलाल हा उधळी रे
नामाची धुंदी चढली रे
देहभान हरपून म्हमदे गेले रंगून (2)

भक्तीच्या तालावर नाच ..........

गोकुळी खेळ हा रंगला रे
    भोळ्या भक्तीवर कान्हा भुलला रे
स्पर्श करी कान्हा अंतरी फुटे पान्हा (2)
जशी सागरात उसळे लाट
नाच रे कान्हा म्हमद्यांच्या मेळ्यात

★★★★★